रयत शिक्षण संस्था, सातारा

| | | |
|---|---|---|
| इयत्ता - 6 वी | द्वितीय सत्र परीक्षा 2024 -25 | गुण - 40 |
| वेळ- 2.00 तास | विषय - सामान्य विज्ञान | पेजेस- 2 |

सूचना:- 1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रश्नाच्या उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.
3) आवश्यक तेथे सुबक व नामनिर्देशित आकृत्या काढा.

**1. A) रिकाम्या जागा भरा.** **3**

1) आकाशातून भक्ष्याचा शोध घेत उडणारी घार ................ गतीने उडते.
2) पदार्थाच्या अंगी असणारी कार्य करण्याची क्षमता म्हणजे ................ होय.
3) ................ हा प्रकाशाचा नैसर्गिक स्त्रोत आहे.

**B) योग्य जोड्या जुळवा.** **3**

| 'अ' स्तंभ | 'ब' स्तंभ |
|---|---|
| 1) सूर्य सदृशतारा | a) दीप्तिहीन |
| 2) चंद्र | b) गतिज ऊर्जा |
| 3) घरंगळणारा पदार्थ | c) व्याध |

**C) आमच्यात वेगळा कोण ओळखा.** **2**

1) रबर, लोखंड, कोबाल्ट, निकेल
2) सूर्यप्रकाश, वारा, लाटा, पेट्रोल

**2. A) खालील प्रश्नांची तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.** **4**

1) गुंतागुंतीची यंत्रे म्हणजे काय ? गुंतागुंतीच्या यंत्राची कोणतीही दोन नावे लिहा.
2) ध्वनी प्रदूषण रोखण्यावर कोणती उपाययोजना कराल ?

**B) खालील कामे करण्यासाठी कोणती यंत्रे वापराल ? त्यांचे प्रकार लिहा.** **2**

1) विहिरीतून पाणी काढणे.
2) टिनच्या डब्याचे झाकण काढणे.

**C) सुबक आकृती काढून नावे द्या. ( कोणतेही 1 )** **2**

1) तरफेचा पहिला प्रकार        2) नालाकृती चुंबक

**3. A) फरक स्पष्ट करा. ( कोणतेही 2 )** **4**

1) स्थितीज ऊर्जा आणि गतिज ऊर्जा        2) स्नायू बल आणि यांत्रिक बल
3) रेषीय गती व यादृच्छिक गती

**B) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **4**

1) व्याख्या लिहा.        a) साधी यंत्र        b) कप्पी
2) खाली दिलेल्या पदार्थ्यांचे चुंबकीय पदार्थ व अचुंबकीय पदार्थ या दोन गटात वर्गीकरण करा.
लोखंड, कोबाल्ट, लाकूड, प्लास्टिक, निकेल

4. A) प्रत्येकी दोन उदाहरणे द्या. **4**

a) रेषीय गती - 1) ................ 2) ..................

b) आंदोलित गती - 1) ................ 2) ..................

c) वर्तुळाकार गती - 1) ................ 2) ..................

d) यादृच्छिक गती - 1) ................ 2) ..................

B) खालीलपैकी प्रत्येक वस्तू दीप्तिहीन किंवा दीप्तिमान आहे ते लिहा. **4**

| वस्तू | दीप्तिमान/ दीप्तिहीन |
|---|---|
| पुस्तक | |
| पेटलेली मेणबत्ती | |
| मेणकापड | |
| पेन्सिल | |
| पेन | |
| बल्ब | |
| टायर | |
| विजेरी | |

5. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. ( कोणतेही 2 ) **8**

1) खालील तक्ता पूर्ण करा.

| अ.नं | ग्रह | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| i) | मंगळ | .................................. |
| ii) | ................ | सूर्यापासून सर्वात जवळचा ग्रह |
| iii) | गुरू | .................................. |
| iv) | ................ | जीवसृष्टी |

2) कोणता चुंबक वापराल ?

i) कचऱ्यामधून लोखंडी पदार्थ वेगळा करायचा आहे.

ii) तुम्ही जंगलात वाट चुकला आहात.

iii) खिडकीची झडप वाऱ्यामुळे सतत उघड-बंद होते.

iv) दारावरची घंटा वाजली पाहिजे.

( विद्युत चुंबक, होकायंत्र, कायमचे चुंबक )

3) कोडे सोडवा.

i) घड्याळातील काट्यांची गती

ii) झाडावरून पडणाऱ्या फळांची गती

iii) गोफणीची गती

iv) मैदानावर खेळणाऱ्या मुलांची गती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 1 नि | |
| | 2 रे | | | |
| | | | | |
| 3 व | | | का | |
| | | | | |
| 4 या | | | | |